जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४६३ दिनांक - २४/०६/२०२३**

## युनिट - २ गुन्हे शाखा पुणे शहर

## गंभीर गुन्हयातील आरोपीस १२ तासाचे आत केले जेरबंद

पुणे शहरातील पाहिजे आरोपी,फरारी आरोपी व रेकार्डवरील आरोपीतांचा शोध घेवुन कायदेशीर कारवाई करणेबाबत वरिष्ठांचे आदेश झाले होते. त्याप्रमाणे गुन्हे शाखा युनिट २ **प्रभारी अधिकारी श्री क्रांतीकुमार पाटील**, पोउपनिरी नितीन कांबळे व युनिट २ कडील पोलीस अंमलदार यांना वरिष्ठांचे आदेशान्वये कायदेशीर कारवाईबाबत आदेश दिले होते.भारती विदयापीठ पोलीस स्टेशन येथे दिनांक २३/०६/२०२३ रोजी खुनाचा प्रयत्न केलेबाबत गंभीर गुन्हा दाखल झाला असून,सदर गंभीर गुन्हयातील आरोपीतांचा शोध घेणेबाबत वरिष्ठांकडून आदेश प्राप्त झाले होते.

त्या प्रमाणे युनिट २ प्रभारी श्री.क्रांतीकुमार पाटील यांनी पोलीस उप निरीक्षक नितीन कांबळे यांचे सोबत युनिट २ कडील अंमलदार याचे पथक तयार केले होते.सदर पथक गुन्हयातील आरोपीतांचा शोध घेत असताना गुन्हे शाखा युनिट २ कडील **पोलीस उप निरीक्षक नितीन कांबळे व पोलीस हवालदार नामदेव रेणुसे** यांना बातमीदारा मार्फतीने बातमी मिळाली की,सदर गुन्हयातील आरोपी कात्रज गाव खंदारे चाळ येथे आलेला आहे. त्याप्रमाणे,आरोपीस ताब्यात घेवुन,त्यांना ओळख सांगुन,त्यांची नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव **पोपट नामदेव माळवे वय ४२ वर्ष रा.कात्रज भैरवनाथ मंदिर शेजारी कात्रजगाव पुणे** असे सांगीतले. सदर बाबत भारती विदयापीठ पोलीस स्टेशन येथे खात्री करता नमूद आरोपी विरोधात **भारती विदयापीठ पोलीस स्टेशन गु.र.क्र.४०३/२०२३ भा.द.वि. कलम ३०७,३२३, ५०४, आर्म ॲक्ट कलम ४(२५) सह मपोॲक्ट ३७ (१)(३) सह १३५** अन्वये गुन्हा दाखल असलेबाबत माहिती प्राप्त झाली.नमुद आरोपीतांस पुढील कायदेशीर कारवाईकामी भारती विदयापीठ पो.स्टे.पुणे यांच्या ताब्यात देण्यात आले आहे

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त श्री.रितेशकुमार,पोलीस सह आयुक्त श्री.संदिप कर्णिक,अप्पर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे,पोलीस उप-आयुक्त,गुन्हे,अमोल झेंडे, सहा.पो.आयुक्त गुन्हे,श्री सुनिल पवार, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, श्री.क्रांतीकुमार पाटील, गुन्हे शाखा,युनिट-२,पुणे शहर,पोउपनि नितीन कांबळे,पोलीस अंमलदार नामदेव रेणुसे,शंकर नेवसे,अमोल सरडे,पुष्पेंद्र चव्हाण,समीर पटेल,मोहसिन शेख,निखिल जाधव,साधना ताम्हाणे व नागनाथ राख यांनी केलेली आहे.